नियमित दिवाणी दावा क्र. ३१/२०२०

| MHNS190003942020 | दावा दाखल तारीख – ०५.०३.२०२०<br>दावा नोंदणी तारीख – ०५.०३.२०२०<br>दावा निकाल तारीख – २३.०३.२०२६<br>कालावधी – वर्ष महिने दिवस<br>०६ ०० १८ |
|---|---|

येवला येथील दिवाणी न्यायाधीश क.स्तर येवला यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी श्री. एस.एम. बोहरा)

रे.दि.मु.क्र. ३१/२०२०

निशाणी क्र.

**बँक ऑफ बडोदा,**

राष्ट्रीयकृत बँक, बॉडी कॉर्पोरेट,

मुख्य कार्यालय : मांडवी, बडोदा,

यांची शाखा – पाटोदा, ता. येवला जि. नाशिक ......**वादी**

विरुध्द

१. **श्री. मनोज बाळासाहेब जाधव,** वय– ३०,

२. **श्री. गणेश बाळासाहेब जाधव,** वय–३२

३. **श्री. माणिक गटु बुल्हे,** वय–५५

४. **श्री. संतोष भागवत घाडगे,** वय–३५

सर्वांचा धंदा – शेती

सर्व रा. मु.पो. शिरसगांव लौकी, ता. येवला ......**प्रतिवादी**

<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३१/२०२०</u>

| दावा रक्कम वसुलीकरीता | | |
|---|---|---|
| वादी तर्फे विधीज्ञ | – | श्री.के.जे.बुब |
| प्रतिवादी तर्फे विधीज्ञ | – | एकतर्फा |

## न्यायनिर्णय

## (घोषीत दिनांक. २३.०३.२०२६)

## दाव्याचे स्वरुप

१) सदरचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द रक्कम वसुल होउन मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

## दाव्यातील कथन

२) वादी बँक ही राष्ट्रीयकृत बँक असुन तिच्या अनेक शाखा असून एक शाखा येवला येथे आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांना त्यांच्या शेतातील पिकांसाठी पिककर्जाची गरज होती. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादी बँक पाटोदा शाखेकडे कर्ज मागणीसाठी अर्ज केला. त्यानुसार प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या पिक कर्जासाठी वादी बँकेने रु. २,००,०००/– इतके कर्ज मंजूर केले. प्रतिवादी क्र.३ व ४ हे सदर कर्जाला जामीनदार आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादी बँकेचे लाभात वचन चिठ्ठी, कंपोझीट हायपोथीकेशन अॅग्रीमेंट, तारण दस्त, लेटर ऑफ अॅक्नॉलजमेंट लिहुन देउन सदरील कर्जासाठी व्याज द.सा.द.शे ७.००% या दराने देण्याचे मान्य केले. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी उचल केलेल्या कर्जाची परतफेड ठरल्याप्रमाणे मुदतीत केली नाही. वादी बँकेने प्रतिवादी क्र.१ व २ यांना वारंवार मागणी करुन सुद्धा त्यांनी कर्ज रक्कम भरण्याची जाणीवपुर्वक टाळाटाळ केली आहे. दावा दाखल तारखे दिवशी प्रतिवादी यांच्याकडून रु. ३,४८,८३५/– इतके येणे होते. सबब रु. ३,४८,८३५/– आणि दि. ०५/०३/२०२०

पासुनचे व्याज रक्कमेची पुर्ण परतफेड होईपर्यंत सदर रक्कमेवर द.सा.द.शे. ९.६५ दराने होणारे व्याजासह रक्कम वसुल होवून मिळणेसाठी हा दावा आहे.

३) प्रतिवादी या प्रकरणात हजर झाले नाही. सबब प्रस्तुत दावा त्यांचे विरुध्द नि.१ कडील दि. ०८/०१/२०२५ रोजीचे आदेशान्वये "एकतर्फा" चालविण्यात आला.

## विचारार्थ मुद्दे

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी बँकेने सिद्ध केले आहे काय की, प्रतिवादीकडून रक्कम रु.३,४८,८३५/- येणे बाकी आहे? | **होकारार्थी** |
| २. | वादी बँकेने सिद्ध केले आहे काय की, ते कर्ज रक्कमेवरील व्याज वसुल करनेस पात्र आहेत? असलेस किती दराने? | **होकारार्थी** |
| ३. | काय आदेश ? | **दावा मंजूर** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत–**

४) वादी बँकेने त्याच्या दाव्यातील कथनाच्या पृष्ठ्यर्थ चेतन श्रीकांत पाटील (वा.सा.क्र.१) यांचे पुराव्याचे शपथपत्र (नि.११) दाखल केले आहे. दाव्यातील कथनाप्रमाणेच, त्यांचा पुरावा असुन सदर पुराव्याच्या आधारे त्यांनी प्रतिवादीस दिलेल्या कर्जाच्या अनुषंगाने कागदपत्र म्हणजेच वचनचिठ्ठी (नि.१२); कम्पोझीट हायपोथिकेशन अॅग्रीमेंट (नि.१३); जनरल फॉर्म ऑफ गॅरंटी (नि.१४); तारण दस्त (नि.१५); रिनिव्हल अॅप्लीकेश (नि.१६); लेटर ऑफ अॅक्नॉलेजमेंट ऑफ डेब्ट (नि.१७,१८,१९); कर्जखाते उतारा (नि.२०); असा कागदोपत्री पुरावा सादर केलेला आहे. वादीने पुरसीस दाखल करुन पुरावा बंद केलेला आहे.

५) प्रतिवादी यांना पुरेशी संधी देवूनही त्यांनी त्यांचा पुरावा अभिलेखावर दाखल

केलेला नाही. सबब दि. ०८/०१/२०२६ रोजी प्रतिवादी यांचे विरुध्द "पुरावा नाही" असा आदेश नि. १ कडे पारित करण्यात आला. वादीतर्फे विधिज्ञ श्री. बुब यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रतिवादी व त्यांचे विधिज्ञ युक्तीवादाकामी गैरहजर राहीले.

६) वादीचे पुराव्या प्रमाणे वादी बँकेने प्रतिवादीस रक्कम रु. २,००,०००/- असे कर्ज दिल्याबाबत (नि. १२ ते १५) कागदपत्रे सादर केली आहेत. प्रतिवादीने वादी यांनी वारंवार मागणी करून देखील थकीत कर्ज रक्कम वादी बँकत भरली नाही. त्यामुळे वादीने दावा मंजूर करणेची विनंती केली.

७) प्रतिवादींनी पुरेशी संधी मिळूनही वादीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास नोंदवला नाही. सबब वादी बँकेचा पुरावा विनाआव्हानीत (Undefended and Unchallenged) राहीला आहे. तसेच प्रतिवादी यांनी स्वतःचा पुरावा अभिलेखावर नोंदवलेला नाही. प्रतिवादींनी वादी बँकेच्या न्यायालयासमोरील कथनास व पुराव्यास कोणतेही आव्हान दिले नाही. त्यामुळे सदर पुरावा प्रतिवादी यांना मान्य असल्याचे सिद्ध होते. त्यामुळे वादी यांनी त्यांचा दावा सिद्ध केला आहे.

८) वादी बँकेने दिलेला मौखिक पुरावा आणि दाखल केलेली कागदपत्र पाहता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादी बँकेकडुन रु. २,००,०००./- इतके कर्ज घेतले असुन सदर बाब प्रतिवादी यांनी नाकारलली नाही. त्यामुळे वादी बँकेला सदर देय रक्कम वसुल करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे वादी बँक प्रतिवादींकडुन रक्कम रु. ३,४८,८३५/- आणि त्यावरील व्याज रक्कम वसुल करणेस पात्र आहे.

९) वादी बँकेने दि. ०३/०३/२०२६ अखेर प्रतिवादींकडुन रक्कम रु. ३,४८,८३५/- येणेबाकी दाखवलेली आहे. त्यामुळे वादी बँकेस दावा दाखल तारखेपर्यंत होणारी रक्कम रु. ३,४८,८३५/- प्रतिवादी यांच्याकडुन वसुल करता येईल. तसेच सदर रक्कम व त्यावरील व्याज दावा दाखल तारखेपासुन ते संपुर्ण रक्कम वसुल होईपावेतो वसुल करता येईल.

१०) वादी बँकेने रक्कम वसुल होउन मिळेपर्यंत द.सा.द.शे ९.६५% दराने कर्ज रक्कम वसुल होवुन मिळणेबाबत मागणी केली आहे. वादी बँकेने दाखल केलेले डी.पी. नोट (नि.१२) कंपोसिट हायपोथिकेशन अॅग्रीमेंट (नि.१३) नुसार प्रतिवादीने कर्ज रक्कम द.सा.द.शे.७% व पिनल चार्ज द.सा.द.शे २% असे एकूण द.सा.द.शे ९% दराने कर्ज परत फेड करण्याचे मान्य केले आहे. त्यामुळे वादी बँकेस थकीत कर्ज रक्क्म द.सा.द.शे. ९% दराने वसुल करता येईल. करीता मुद्दा क्र.१ व २ वर होकारार्थी निष्कर्षीले आहेत. मुद्दा क्र.३ करीता पुढीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

## हुकुम

१. दावा खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी वैयक्तीकरित्या व संयुक्तीकरित्या वादी बँकेस रक्क्म रु. ३,४८,८३५/- दिनांक ०३.०३.२०२० पर्यंत व त्यावरील व्याज द.सा.द.शे. ९% नुसार दिनांक ०३.०३.२०२० पासुन संपूर्ण दावा रक्कम फिटे पर्यंत द्यावी.

३. येणेप्रमाणे हुकुमनामा करण्यात यावा.

BOHARA SHANTILAL MANIKCHAND

Digitally signed by BOHARA SHANTILAL MANIKCHAND
Date: 2026.03.25 11:03:53 +0530

**दिनांक–२३.०३.२०२६**

**(एस.एम.बोहरा)**
**दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, येवला, जि. नाशिक**

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३१/२०२०</u>**

मी असे प्रमाणित करते की, या PDF न्यायनिर्णयामधील मजकूर शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | लघुलेखकाचे नाव | : | कु. व्ही. ए. चव्हाण (क. लिपीक) |
| २ | न्यायालयाचे नाव | : | श्री. एस. एम. बोहरा,<br>न्यायादंडाधिकारी, प्र.वर्ग,<br>येवला, जि. नाशिक |
| ३ | न्यायनिर्णय व आदेशाची तारीख | : | २३/०३/२०२६ |
| ४ | पिठासीन अधिकारी यांनी सही केलेले न्यायनिर्णयाची तारीख | : | २३/०३/२०२६ |
| ५ | न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | २५/०३/२०२६ |